





डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२/२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net


# गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या (भाग–३)

## कोंबडी गाते गाणी



प्रकाशकः

डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२
२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net

डोअर स्टेप स्कूल
५२/५३ जे.एस. म्युनसिपल स्कूल
नाना चौक, ग्रॅन्ट रोड
मुंबई ४००००७
☎ २३८२६३४३/२३८५९२०३

© डोअर स्टेप स्कूल

**किंमत र**

तिसरी आवृत्ती :
मार्च २००४
कव्हर :
बी. सुहासिनी
आतील चित्रे :
कॉम्प्युटर ग्रॅफिकस आणि
संपदा भानप, शमा जोशी व
बी. सुहासिनी

# कोंबडी आणि बदक

एक होती कोंबडी आणि एक होते बदक. बदक पित होते पाणी आणि कोंबडी गात होती गाणी. कोंबडीला लागली तहान. ती गेली बदकाकडे.



तिने बदकाला विचारले, "बदकदादा बदकदादा, मला देतोस थोडे पाणी ?"

"तू मला काय देशील ?" बदकाने उलट विचारले.

"मी तुला गाणे गाऊन दाखवीन. चालेल ?"





"चालेल की, हे घे पाणी." बदकाने चोचीत पाणी घेतले आणि कोंबडी काठावर उभी होती तिथे तिला नेऊन दिले.



पाणी पिऊन कोंबडी खूष झाली, गोड गोड गाणे गाऊ लागली. बदक देखील खूष झाले, गाणे

ऐकून नाचू लागले. मुले देखील खूष झाली, गोष्ट ऐकून झोपून गेली.

□□□

सराव करा

| | |
|---|---|
| पोष्ट उघडले | खाष्ट सासू |
| गोष्ट ऐकली | धष्टपुष्ट भीम |
| शिष्ट कमल | कष्ट करा |
| दुष्ट राक्षस | स्पष्ट बोला |
| उष्टा पेरू | मिष्टान्न |



# खारूताई व उंदीरमामा

खारूताई आणि उंदीरमामा थोडे सारखे दिसतात पण बरेच निराळे असतात.



नीट बघा बरं. तोंड कसे निमुळते. दोघांचेही एकसारखे.

दोघेही मागील पायांवर उभे राहतात. पुढचे पाय हातासारखे

वापरतात. दोन हातात धरावी तशी दोन पायांत शेंग धरतात. हळूच तोंडाजवळ नेऊन कुरकुर आवाज करीत खातात. खाता खाता मान जरा वाकडी करून, इकडे तिकडे बघत राहतात.



खारूताईची शेपटी पहा. कशी आहे गोंडेदार, झुपकेदार. कुठे थोडा आवाज झाला की



खारूताई आपली शेपटी उंच करते. थोडी थांबून इकडे तिकडे बघते. मग एकदम तुरूतुरू पळत जाऊन झाडावर चढते.



झाडावर ते लहानसे बिळासारखे भोक दिसते ना तिथे तिचे घर असते. घरात जाऊन लपून बसते.

उंदीरमामाची शेपटी पहा. कशी बारीक सुतळीसारखी, दोरीसारखी. थोडा आवाज झाला की उंदीरमामा थांबत नाहीत ते धूम ठोकून बिळात



शिरतात. उंदीरमामा जमिनीखाली राहतात. जमीन उकरून बीळ करतात आणि तेथेच आपले घर मांडतात.

खारूताई दिवसभर इकडे तिकडे बघत बघत शेपटीचा गोंडा नाचवीत



झाडावरून जमिनीवर आणि जमिनीवरून झाडावर तुरूतुरू पळत असतात साधे फारसे चालत नाहीत. अंधार झाला की हिंडत नाहीत.

उंदीरमामा दिवसा बाहेर पडत नाहीत. बिळात लपून बसतात. दिवस मावळला, अंधार पडला की हळूच बिळातून बाहेर येतात. लपत छपत फिरत असतात, खायला काय मिळते ते शोधत राहतात. मनी माऊची चाहूल लागली की घाबरून जाऊन पळत सुटतात.



असे असतात खारूताई आणि उंदीरमामा थोडे सारखे, थोडे निराळे, आपले आपले वेगवेगळे!

❑❑❑





एकदा एक छोटेसे माकड एका झाडाजवळ आले. ते त्या झाडाखाली उभे राहिले. त्याने मान वरती करून झाडाकडे पाहिले.



झाडावर खूप बोरे होती. माकडाला ती बोरे खावीशी वाटली. माकड झाडावर चढू लागले.

चढता चढता माकडाचा पाय झाडावरून घसरला. ‘धपकन’ आवाज आला आणि माकड खाली पडले. माकडाला थोडेसे लागले पण ते काही रडले नाही.

माकड परत झाडाजवळ गेले व त्याने मान वर करून पाहिले. पिकलेल्या बोरांचा छान वास सुटला होता. पिकलेली लाल लाल बोरे पाहून माकडाच्या तोंडाला पाणी



सुटले. माकड विचार करू लागले–‘कशी बरे काढावी बोरे ? काय बरे करावे ?’ माकडाला एक युक्ती सुचली. त्याने झाड गदागदा हलवले. लाल लाल बोरे



टपाटपा खाली पडली.

माकडाला खूप मजा वाटली. त्याने दोन हातांनी बोरे पटापटा वेचली. भरपूर बोरे गोळा केली.





तिकडून माकडाचे सगळे सवंगडी आले. खारूताई आली, चिऊताई आली, ससोबा आले, सगळे सगळे आले. पण वाघोबा मात्र नाही हं आले.

सगळयांनी मिळून बोरांवर ताव मारला. पोट भरून बोरे खाल्ली. खूप खूप मज्जा केली.

❑❑❑

# वाचा थोडी जोडाक्षरे

गोष्ट खाष्ट शिष्ट दुष्ट
धष्टपुष्ट उष्टंमाष्टं

मित्र पत्र रात्र मात्र
कुत्रा भित्रा पत्रा जत्रा

शक्ति युक्ति भक्ति सक्ति
अशक्त सशक्त रक्त

❑❑❑



# आमची पुस्तके


अ–गट
- पुस्तकमाला भाग–१ (मुळाक्षरे)
- पुस्तकमाला भाग–२ (आकार)
- पुस्तकमाला भाग–३ (ईकार)
- पुस्तकमाला भाग–४ (उकार)
- पुस्तकमाला भाग–५ (एकार)
- पुस्तकमाला भाग–६ (ऐकार)
- पुस्तकमाला भाग–७ (ओकार)
- पुस्तकमाला भाग–८ (औकार)

ब–गट
- मुळाक्षरांचे पुस्तक
- कान्याचे पुस्तक
- वेलांटीचे पुस्तक
- उकारांचे पुस्तक
- एका मात्रेचे पुस्तक
- दोन मात्रांचे पुस्तक
- ओकाराचे पुस्तक
- औकाराचे पुस्तक

- जोडाक्षरांचा सराव – २ भाग
- कोडीच कोडी मजाच मजा – २ भाग
- लहान शब्दकोश
- गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या
- हस्तपुस्तिका
- बहिस्थ परिक्षेसंबंधीची माहिती
- वयाचा दाखला कसा काढावा ?
- शालेय वाचनालय चालवताना